| ९७ | श्री. संतोष गणपत मांजरेकर | १२९ | श्री. राजू भूपाल वाघमारे | १६१ | श्री. प्रशांत गंगाराम पाटील |
| ९८ | श्री. आलजी रामजी बारिया | १३० | श्री. दिनेश दत्ताराम सावंत | १६२ | श्री. विनायक विजय भांगरे |
| ९९ | श्री. जनार्दन बाबुराव भेकरे | १३१ | श्री. भाग्यवंत यशवंत बांबरकर | १६३ | श्री. संजय पांडूरंग वारघडे |
| १०० | श्री. नितिन शशिकांत साळवी | १३२ | श्री. दिपक धोंडू राणे | १६४ | श्री. सतिश अर्जुन पाटील |
| १०१ | श्री. विजय केरू कांबळे | १३३ | श्री. विलास शिवराम मोरे | १६५ | श्री. हरिश बाबू मास |
| १०२ | श्री. अशोक सिताराम सुर्वे | १३४ | श्री. दिनेश प्रेमजी सोसा | १६६ | श्री. परेश प्रभाकर शिंदे |
| १०३ | श्री. बाबासाहेब लिंबाजी तांबवे | १३५ | श्री. विजय मनोहर घाडी | १६७ | श्री. सोमनाथ पांडूरंग तावरे |
| १०४ | श्री. नारायण धोंडू आखाडे | १३६ | श्री. दिपक नारायण हेदूळकर | १६८ | श्री. सिध्देश सदाशिव केसरकर |
| १०५ | श्री. संभाजी मारुती साळूंखे | १३७ | श्री. जयदीप गोपळ गुरव | १६९ | श्रीमती. नंदिनी नंदकुमार सावंत |
| १०६ | श्री. बाबल्या गोविंद कोकरे | १३८ | श्री. चंद्रकांत वाळू साबळे | १७० | श्री. विजय भिकू मोजर |
| १०७ | श्री. प्रशांत दिगंबर कांबळी | १३९ | श्री. संजय कृष्णा शिंगरे | १७१ | श्री. राजू भुपाल वाघमारे |
| १०८ | श्री. सुरेंद्र प्रल्हाद भोंडवे | १४० | श्री. प्रकाश मंगेश साळगांवकर | १७२ | श्री. निळकंठ कृष्णा वायंगणकर |
| १०९ | श्री. उमेश अनंत पार्टे | १४१ | श्री. बापू सुरबा चिंदरकर | १७३ | श्री. अशोक काशीनाथ पवार |
| ११० | श्री. महेश वासुदेव जाधव | १४२ | श्री. सुनिल शिवराम घाडी | १७४ | श्री. उदय अनंत तांबे |
| १११ | श्री. विदेश रामदास पेडणेकर | १४३ | श्री. नामदेव शामराव साळवे | १७५ | श्री. अतुल मोहन तांबे |
| ११२ | श्री. एकनाथ गोटीराम भोईर | १४४ | श्री. महेंद्र यशवंत जाधव | १७६ | श्री. राजेंद्र शंकर जाधव |
| ११३ | श्री. प्रशांत प्रभाकर जाधव | १४५ | श्री. श्रीपाल जगदिश वाल्मिकी | १७७ | श्री. नरेंद्र रामचंद्र सावर्डेकर |
| ११४ | श्री. प्रविण गोविंद राणे | १४६ | श्री. चंद्रकांत एकनाथ भोसले | १७८ | श्री. मनुभाई मावजी परमार |
| ११५ | श्री. मिलिंद वामन रेडीज | १४७ | श्री. भास्कर रंगनाथ भोसले | १७९ | श्री. अरविंद केरु कांबळे |
| ११६ | श्री. नरेश एकनाथ सावंत | १४८ | श्री. अरविंद गणपत गुरव | १८० | श्री. मोहन शांताराम चिले |
| ११७ | श्री. मावजी करसन राठोड | १४९ | श्री. सचिन सयाजी काळे | १८१ | श्री. हितेश अशोक काळोखे |
| ११८ | श्री. सुधीर चंद्रकांत गायकवाड | १५० | श्री. अशोक यल्लप्पा बोरकर | १८२ | श्री. जितेंद्र महादेव केणी |
| ११९ | श्री. शिलानंद सुदाम साळवी | १५१ | श्री. सुशील प्रभाकर नारिंग्रेकर | १८३ | श्री. जागेश्वर कवडू राठोड |

# हाफकिन महामंडळाच्या कोविड योद्धांचा गौरव



फैल गया है वायरस से कोरोना, कहती हूँ इससे डरो ना,
बस सख्त सावधानी है रखना, बंद कर दो किसी से हाथ मिलाना ।

# हाफकिनच्या कोविड योध्दांसाठी वसाहतीमधील महिला सदस्यांनी बनविले फेस मास्क

देशात लॉकडाऊन लागल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी फेस मास्क आवश्यक होते अशा वेळी बाजारात देखील फेसमास्कचा तुटवडा होता. हाफकिन महामंडळाच्या वसाहतीमधील महिला सदस्यांनी फेस मास्क बनवण्याचे ठरविले. महामंडळाकडून चांगल्या प्रतीचे कॉटनचे कापड,रबर, आणि इतर आवश्यक साहित्य पुरविले; अवघ्या ५ दिवसांत हाफकिन महामंडळाच्या वसाहतीमधील महिला सदस्यांनी १५०० फेस मास्क तयार करून महामंडळाला सुपूर्द केले. या फेस मास्कचे वाटप महामंडळातील सर्व कर्मचाऱ्यांना करण्यात आले. अत्यंत अडचणीच्या प्रसंगी महामंडळातील महिला सदस्यांनी अहोरात्र मेहनत करून फेस मास्क बनविले. वसाहतीमधील महिला सदस्यांचे विशेष आभार आणि धन्यवाद.















## श्री पवन मेस्त्री यांचे अभिनंदन

हाफकिन महामंडळाच्या परळ विभागातील कर्मचारी श्री. पवन यशवंत मेस्त्री यांनी लालबागचा राजा आरोग्योत्सव कार्यक्रमांतर्गत प्लाझ्मा दान शिबिरामध्ये सहभागी होऊन दि २७.०८.२०२० रोजी प्लाझ्मा दान केले.

लॉक डाऊन सुरु झाल्यापासून श्री. मेस्त्री हे हाफकिन महामंडळाच्या 'कोविड १९ सीएसआर अंतर्गत मदत स्वीकृती कार्यालयामध्ये' कार्यरत होते. मध्यंतरीच्या काळात त्यांना कोरोनाचा संसर्ग झाला पण न घाबरता कोरोना आजारावर यशस्वीरित्या मात करून ते परत महामंडळात कामावर रुजू झाले. कोरोना आजारातून बरे होऊन त्यांनी केलेले प्लाझ्मा दान हे आजच्या महामारीच्या काळातले सर्वश्रेष्ठ दान आहे. श्री पवन मेस्त्री यांचे विशेष अभिनंदन !!



# कोविड १९ जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना




**हा**फकिन महामंडळातील कामगार प्रशिक्षण वर्गातंर्गत कामगारांनी लॉकडाऊन लागण्यापूर्वी 'कोरोना विषाणू बाबत माहिती आणि घ्यावयाची काळजी, दक्षता' याबाबत माहितीपर बॅनर तयार केले आणि ते बॅनर महामंडळ कार्यालय, वसाहत, कार्यालयाबाहेरील परिसर, के.ई.एम. रुग्णालयाबाहेर, भोईवाडा पोलिस स्टेशन बाहेर आणि महत्वाच्या चौकांमध्ये लावण्यात आले.

कोरोना संबंधी जनजागृती निर्माण करण्यामध्ये या बॅनर ने महत्वपूर्ण कामगिरी केली.





**लॉ**कडाऊनच्या कालावधी दरम्यान हाफकिन वसाहतीमध्ये राहणारे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी शासनाने सोपविलेली सी.एस.आर. अंतर्गत दात्यांकडून वैद्यकीय साधने व वस्तू स्वीकारून त्यांचे वितरण करणे आणि जीवनावश्यक औषधांचे उत्पादन करून त्याचा पुरवठा शासनाला करणे या दोन्ही जबाबदाऱ्या सुरळीतपणे पार पाडल्या, अशा वेळी सुट्टी न घेता रात्रंदिन काम करावे लागले. अशा प्रसंगी वसाहतीमधील कर्मचाऱ्यांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा व्हावा या हेतूने दूध सेवा आणि शेतकऱ्यांशी संपर्क साधून भाजीपाला आणि फळे सुविधा उपलब्ध करण्यात आली. याकरीता सामाजिक कार्यकर्ते ॲड. उजाला यादव आणि श्री. दया आरेकर यांचे सहकार्य लाभले. या सुविधांमुळे वसाहतीबाहेर कर्मचारी गेले नाही आणि वसाहतीमध्ये कोरोनाचे संक्रमन रोखण्यास मदत झाली.








**म**हाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,नायगाव केंद्रामार्फत हाफकिन महामंडळातील कर्मचारी यांना २५० कापडी फेस मास्कचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र कामगार मंडळाच्या केंद्र महिला कल्याण सहाय्यिका श्रीमती मृण्मयी मोडक आणि श्री. अनिल लोखंडे, केन्द्र संचालक यांनी हाफकिन महामंडळाचे महाव्यवस्थापक उत्पादन श्री. सुभाष शंकरवार आणि कामगार कल्याण अधिकारी श्री. अमित डोंगरे यांच्याकडे फेसमास्क सुपूर्द केले.



# कोविड १९ जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना

**रो**गप्रतिकारक शक्ती वाढावी या हेतूने हाफकिन गणेशोत्सव समिती मार्फत हाफकिन वसाहतीमधील सर्व कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्सेनिक अलबम च्या गोळ्यांचे वाटप करण्यात आले.



**म**हामंडळ वसाहतीमध्ये कोरोनाचे संक्रमण होवू नये म्हणून संपूर्ण वसाहतीमधील परिसर वेळोवेळी निर्जंतुकीकरण करण्यात आला.



**बृ**हन्मुंबई महानगरपालिकेच्या एफ साऊथ विभागामार्फत हाफकिन महामंडळामध्ये कोरोना ट्रेसिंग कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पच्या माध्यमातून महामंडळ वसाहतीमधील सर्व कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांची तसेच बाहेरुन कामावर येणाऱ्या कर्मचाऱ्यांची देखील तपासणी करण्यात आली.



**म**हामंडळामध्ये प्रवेश करताना सर्व कर्मचारी आणि बाहेरील अभ्यंगत यांचे प्रथम ऑक्सिमीटर ने ऑक्सिजन तपासले जाते आणि टेम्परेचर गण ने शरीराचे तापमान तपासले जाते त्यानंतरच महामंडळामध्ये प्रवेश देण्यात येतो.



**ज्या** ज्या वेळी देशावर आरोग्यासंदर्भात कोणतीही आपदा आली त्या त्या वेळी हाफकिन महामंडळ धावून आले आहे. दि.२६ जुलै २००५ रोजी मुंबई मध्ये आलेल्या अतिवृष्टीमुळे साथीच्या रोगांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते अशा वेळी हाफकिन महामंडळाने तात्काळ जीवनावश्यक औषधांचा पुरवठा बृहन्मुंबई महानगरपालिकेला केला होता. हाफकिन महामंडळाने केलेल्या कार्याची दखल घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाफकिन महामंडळाला गौरविण्यात आले होते.



Municipal Corporation of Greater Mumbai

Presented To

M/S. HAFFKIN BIO PHARMA LTD.

In recognition of the valuable assistance rendered to the Municipal Corporation of Greater Mumbai in dealing with the situation arising from the unprecedented rains and floods in Mumbai on 26/27 July 2005.

Sponsored by
Kuoni Travel Group, India

ना स्पर्श ना हाती हात
तरी सोबत विश्वासाची साथ.
एक जिद्द आणि एक ध्यास,
करुया कोरोनाचा सर्वनाश

लढवय्ये झालो आम्ही ही
हाफकिनच्या मातीतले
स्फुर्ती ही घेऊनी हृदयी
संकट हरवू जगातले
आहे आम्हा विश्वास
पुन्हा उगवेल तो प्रकाश
एक जिद्द आणि एक ध्यास
करुया कोरोनाचा सर्वनाश

मित्र हे आमुचे सारे
जे लढती होऊनी तारे
अभिमान उरी या आमुच्या
तुम्हा मुळेच आहे सारे
सलाम तुम्हासी हे वीरांनो,
तुम्हीच घडवला इतिहास
एक जिद्द आणि एक ध्यास,
करुया कोरोनाचा सर्वनाश.

**श्री. जितेन्द्र लक्ष्मण तांबे**

**कोरोना! कोरोना! कोरोना! इसका होना मतलब जिंदगी को खोना, इससे बचना है तो हाथों को ध्यान से धोना, साथ में उबला पानी ही पीना और घर में ही जीना।**

# मा. व्यवस्थापकीय संचालक यांचा निरोप समारंभ



**मा.** व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेश देशमुख (भा.प्र.से.) यांची दि.१७.०८.२०२० रोजी पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे.

डॉ. राजेश देशमुख सरांनी मागील १५ महिने हाफकिन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार सांभाळला; या काळात हाफकिन महामंडळाला सरांच्या मार्गदर्शनाचा खूप फायदा झाला. सरांच्या सहकार्यामुळे शासनाकडून हाफकिन महामंडळाच्या उत्पादनांना मोठ्या प्रमाणावर मागणी मिळाली त्यामुळे यावर्षी हाफकिन महामंडळाची उलाढाल १५० कोटी पर्यंत पोहोचली. मुंबई जिल्हाधिकारी यांच्या मदत निधीमधून महामंडळातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करून त्यांचे डांबरीकरण करण्यात आले. महामंडळाची 'ई टेंडर' बाबत जाहिरात खाजगी दरांमध्ये प्रसिद्ध न होता ती डीजीआयपीआर दराने वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध होऊ लागली. या सर्व गोष्टींमुळे महामंडळाची आर्थिक बचत मोठ्या प्रमाणावर झाली. शासकीय कार्यालयीन कामकाजाप्रमाणे प्रस्ताव सादर होऊ लागले, जुन्या आवश्यक माहितीचे जतन करून अनावश्यक कागदपत्रे, रेकॉर्ड यांची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात आली या सर्व गोष्टींमुळे प्रशासकीय कामकाज सुरळीत होवून त्यास गती मिळाली.

निरोप समारंभात हाफकिन महामंडळाच्या वतीने डॉ. राजेश देशमुख सरांना महाव्यवस्थापक (उत्पादन) श्री सुभाष शंकरवार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, डॉ. हाफकिन यांचे स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. महामंडळातील सर्व विभागप्रमुखांच्या वतीने टेनिस रॅकेट सप्रेम भेट म्हणून देऊन सरांचे आभार मानण्यात आले.

डॉ. राजेश देशमुख सरांच्या सहकार्यामुळे मुंबई जिल्हाधिकारी यांच्या मदत निधीमधून डिसेंबर २०१९ मध्ये महामंडळातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली.

याप्रसंगी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेश देशमुख (भा.प्र.से.), शिवडी विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. अजय चौधरी, श्री. सुभाष शंकरवार महाव्यवस्थापक (उत्पादन), श्री. प्रणय पार्लेवार स्थापत्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्री. सी. बी. बाळदकर उप अभियंता, श्री. महेश पी. लाड सहाय्यक अभियंता, श्री. संतोष शां. बेंडल स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक आदी मान्यवर उपस्थित होते.




## डिझास्टर मॅनेजमेंट



**म**हाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने 'डिझास्टर मॅनेजमेंट' बाबत विशेष कार्यक्रमाचे आयोजन यावर्षीच्या जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात केले होते. हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे सुरक्षा समिती सदस्य या कार्यक्रमाकरिता सहभागी झाले होते. महाराष्ट्र शासनाने श्रीमती बेनलता सेन (यु.एस.ए.) आणि श्रीमती रोझीना (यु.एन.डी.पी.) यांची डिझास्टर मॅनेजमेंट क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती म्हणून नेमणूक केली होती. कोणतीही नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्ती आल्यास करावयाच्या योजना व प्रतिबंधात्मक उपाय याविषयी तज्ज्ञांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी कोरोना विषाणूचा उद्रेक भारतामध्ये झाला नव्हता; परंतु कोरोना विषाणूचा उद्रेक झाल्यास काय काळजी घ्यावी याविषयी या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली या चर्चेचा फायदा पुढे कोरोना लॉक डाऊनच्या काळात हाफकिन महामंडळाला झाला.


देश ने हमेशा हर परिस्थिति में आपका साथ दिया है, लेकिन आज देश आपका साथ मांग रहा है
घर पर रहे सुरक्षित रहे ।

# प्लेग निर्मुलनामध्ये योगदान

**स**न १९९४ साली सप्टेंबर महिन्यामध्ये सुरत आणि बीड येथे प्लेगमुळे हाहाकार माजला होता. बीड येथे १८३ माणसांना प्लेगसदृश आजाराची लागण झाली होती. सुरतमध्ये तर हजारो माणसांना प्लेगसदृश आजाराची लागण झाली होती तर ६०जण मृत्युमुखी पडले होते. त्यावेळी ४ लाख माणसांनी सुरत सोडून इतर भागामध्ये स्थलांतर केले होते. इतर देशांनी त्यांच्या विमानतळावर भारतामधून येणाऱ्या पर्यटकांची मेडिकल चाचणी अनिवार्य केली होती. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेबल डिसीज या संस्थेने हा आजार प्लेगच आहे असे सांगितले. तत्कालीन हाफकिन संस्थेचे संचालक डॉ. व्हि. एल.येमूल यांनी सांगितले की, 'जरी हा प्लेगसदृश आजार असला तरी याला प्लेग म्हणून लगेच शिक्कामोर्तब करू नका,यामुळे भारताची जागतिक पातळीवरील प्रतिमा मलीन होईल, देशाचे आर्थिक नुकसान होईल तसेच निर्यात आणि पर्यटन क्षेत्राला मोठा फटका बसेल.' १९९३ साली लातुरमध्ये झालेल्या भूकंपामुळे मोठया प्रमाणावर उंदीर मृत्युमूखी पडले व काही उंदीर मनुष्याला चावल्यामुळे त्यांचे जंतू मनुष्याच्या शरिरात जावून हा प्लेगसदृश संसर्गजन्य आजार निर्माण झाला असा निष्कर्ष काढण्यात आला.




हाफकिन महामंडळाचे प्लेग डायग्नोसीस रिएजंटस् किटस

त्यावेळी जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्य खात्यामार्फत अमेरिकेहून एक खास टीम बोलावली व त्यांनी चाचणी करुन तो प्लेगच असल्याचे सिध्द केले. त्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेने केंद्र शासनाशी सहयोग करुन पुन्हा अशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे ठरविले. यानुसार हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळातील अधिकारी डॉ. मीरा सौकुर आणि श्रीमती. ज्योत्स्ना नाडकर्णी यांनी अमेरिकेतील सेंटर ऑफ डिसीज कंट्रोल ॲण्ड प्रीव्हेंशन, कोलेरेडो येथे जावून 'प्लेग डायग्नोसीस रिएजंटस् किटस' च्या उत्पादनाचे प्रशिक्षण घेतले. या एका आठवडयाच्या प्रशिक्षणानंतर हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाने मुंबईमध्ये प्लेगची चाचणी करण्यासाठी 'प्लेग डायग्नोसीस रिएजंटस् किटस' तयार केले. आणि सन १९९६ पासून दिल्लीच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेबल डिसीज या संस्थेला प्लेग डायग्नोसीस रिएजंटस् किटसचा पुरवठा होत आहे. त्यावेळची नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेबल डिसीज आणि सध्याची नॅशनल सेंटर फार डिसीज कंट्रोल ही संस्था संक्रामक रोगांना नियंत्रित करण्याचे काम करते.

अशीच घटना हिमाचल प्रदेशमध्ये काही वर्षापूर्वी एका गावामध्ये घडली होती. जेथे प्लेगचा प्रादुर्भावामुळे एका घरातील पाच लोक दगावले होते. त्यानंतर त्वरीत दिल्ली येथील नॅशनल सेंटर फॉर डिसीझ कंट्रोल यांच्या शास्त्रज्ञांनी तेथे जावून हाफकिन महामंडळाचे प्लेग डायग्नोसीस कीट वापरुन हे सिध्द केले की दगावलेले व्यक्ती हे प्लेगच्या प्रार्दुभावामुळे दगावले आहेत. व पुढील लसीकरण करणे शक्य झाले. त्या गावातील इतर गावक-यांना घरातच थांबण्यास सांगण्यात आले. आणि गावामध्ये येणा-या लोकांची ये-जा थांबविण्यात आली या सर्व प्रक्रियेमुळे प्लेगचा प्रार्दुभाव इतरत्र पसरु शकला नाही. व मनुष्य हानी हि फक्त ५ वरच मर्यादित राहिली. यावेळी सूरतच्या तुलनेमध्ये मनुष्य हानी रोखण्यास शासनास यश आले आणि हे प्लेग डायग्नोसीस कीटच्या त्वरीत उपयोगामुळे होवू शकले.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या 'प्लेग डायग्नोसीस रिएजंटस् किटस' च्या सहाय्याने नॅशनल सेंटर फार डिसीज कंट्रोल यांनी चाचणी केल्यामुळे प्लेग आटोक्यात आला. आणि लोकांचे जीव वाचले. सध्या प्लेग भारतामध्ये अस्तित्वात नाही परंतु हे प्लेगचे जंतु सुप्त अवस्थेमध्ये जमिनीत वर्षानुवर्षे जीवंत राहू शकतात. म्हणूनच उंदरांचे रक्त तपासून प्लेगची चाचणी करण्यासाठी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे 'प्लेग डायग्नोसीस रिएजंटस् किटस' गरजेचे आहे.

दि. १० जानेवारी १८९७ ला डॉ. हाफकिन यांनी प्रति प्लेग लसीची चाचणी स्वत:वर केली. स्वत:वरील प्रयोगाची बातमी यशस्वी झाल्यानंतर त्यांनी तयार केलेली प्रति प्लेग लस हि मानवासाठी अपायकारक नाही हे सिध्द केले. या प्रति प्लेग लसीमुळे त्यावेळी लाखो भारतीयांचे प्राण वाचले होते.

दि. ३०.०९.१९९४ रोजी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाकडून प्रति प्लेग लसींचा पुरवठा बृहन्मुंबई महानगरपालिकेला करण्यात आला; यावेळी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष पद्मभूषण डॉ. बी.के.गोयल आणि तत्कालीन व्यवस्थापकिय संचालक श्री. चाँदगोयल (भा.प्र.से.) यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तत्कालीन महापौर श्रीमती. निर्मला सामंत प्रभावळकर यांना प्लेग लसींचा पुरवठा केला याची क्षणचित्रे.





# आनंद सोहळा वर्धापन दिन



## परळ, मुंबई विभाग




**हा**फकिन जीव - औषध निर्माण महामंडळाचा ४५ वा वर्धापन दिन १ सप्टेंबर २०१९ रोजी हाफकिन संस्थेच्या ऐतिहासिक दरबार हॉल येथे हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. डॉ. राजेश देशमुख ( भा. प्र. से.) तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

याप्रसंगी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेश देशमुख (भा. प्र. से.), श्री. सुभाष शंकरवार, महाव्यवस्थापक (उत्पादन), श्री. बबन जी. ढेकणे, अध्यक्ष हाफकिन ऑफिसर्स असोसिएशन, श्री. नितीन तिर्लोटकर, उपाध्यक्ष मान्यताप्राप्त कामगार संघटना मुंबई या मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि डॉ.हाफकिन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रसिद्ध तुतारी वादक श्री. पांडुरंग गुरव यांनी तुतारीवादन करून कार्यक्रमाचे वातावरण अल्हाददायक केले.




श्रीमती रश्मी शिंपी, श्रीमती श्रेयसी मुळे, श्रीमती उषा मकवाना, श्री धनंजय राऊत, श्री बाबासाहेब तांबवे यांनी सरस्वती वंदना गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली.

प्रतिवर्षीप्रमाणे हाफकिन जीव - औषध निर्माण महामंडळाच्या 'हाफकिन वृत्त' या मुखपत्राच्या १२ व्या अंकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

द्वितीय सत्रामध्ये संगीत वाद्यवृदांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये महामंडळातील कर्मचाऱ्यांनी नृत्य, गायन, नाटक सादर केले.


























# वर्धापन दिन आनंद सोहळा



## पिंपरी विभाग









**हा**फकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग येथे १ सप्टेंबर २०१९ या ४५ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख अतिथी म्हणून ॲड. श्री. गौतम चाबुकस्वार, आमदार पिंपरी विधानसभा मतदारसंघ आणि डॉ. जयंत करंदीकर यांना निमंत्रित करण्यात आले होते.



याप्रसंगी डॉ. शिवाजी गाडे, व्यवस्थापक प्रतिविष व रक्तजल विभाग पिंपरी, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ॲड. श्री. गौतम चाबुकस्वार आणि डॉ. जयंत करंदीकर, श्री प्रविण वाघमारे, उपाध्यक्ष मान्यताप्राप्त कामगार संघटना पिंपरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले आणि डॉ. हाफकिन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी डॉ. जयंत करंदीकर यांनी ताणतणाव व्यवस्थापन आणि व्यसनमुक्ती बाबत कर्मचाऱ्यांना माहिती दिली. विशेष म्हणजे या कार्यक्रमामध्ये कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी ‘वृक्ष संवर्धन आणि पर्यावरणाचे संरक्षण’ याविषयी नाटिका सादर केली. हाफकिन महामंडळातर्फे सर्व कर्मचाऱ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.







## जळगाव विभाग

१ सप्टेंबर २०१९ या ४५ व्या वर्धापन दिनानिमित्त हाफकिन अजिंठा फार्मा. लि. जळगाव येथे डॉ. हाफकिन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून हाफकिन दिन साजरा करण्यात आला.





# कामगार प्रशिक्षण वर्ग

**हा**फकिन जीव-औषध निर्माण महामंडळ कामगार कल्याण उपक्रमांतर्गत कामगारांमध्ये एकोपा, बंधुत्व व समानतेची भावना निर्माण व्हावी आणि राष्ट्रविकास, कंपनीच्या विकास, कुटुंबाचा विकास आणि स्वव्यक्तिमत्व विकास व्हावा या उद्देशाने 'कामगार प्रशिक्षण वर्ग' कार्यक्रमाचे आयोजन करते.

भारत सरकारच्या दत्तोपंत ठेंगडी राष्ट्रीय श्रमिक एंव विकास बोर्ड, मुंबई यांच्यामार्फत महामंडळाच्या परळ विभागामधील कामगारांकरिता '४५ दिवसांचे कामगार प्रशिक्षण वर्ग' कार्यक्रमाचे फेब्रुवारी २०२० मध्ये आयोजन करण्यात आले होते.

या कामगार प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत महामंडळाचे कामगार कल्याण अधिकारी श्री. अमित डोंगरे, महामंडळाचे मान्यताप्राप्त कामगार शिक्षक श्री. किरण जाधव आणि श्री. प्रदिप आचरेकर यांनी कामगारांना विविध विषयांवर प्रशिक्षण दिले.

काही महत्त्वाच्या विषयांकरिता बाहेरील तज्ज्ञ प्रशिक्षकांना निमंत्रित करण्यात आले होते.

दत्तोपंत ठेंगडी राष्ट्रीय श्रमिक एंव विकास बोर्डाचे प्रादेशिक संचालक श्री. मून सर यांच्या हस्ते दिनांक ३ फेब्रुवारी २०२० रोजी कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मून सरांनी 'उत्पादन उत्पादकता' याविषयी प्रशिक्षण दिले.

**प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये खालील नमूद विषयांवर तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत प्रशिक्षण देण्यात आले.**

| | |
|---|---|
| **श्री. प्रदिप आचरेकर** | - कामगार प्रशिक्षण का, काय व कसे ?<br>- कामगार संघटनेचा इतिहास<br>- ILO इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन<br>- भारतीय राज्यघटना |
| **श्री. किरण जाधव** | - वेळेचे व्यवस्थापन<br>- जादूटोणा विरोधी कायदा व अंधश्रद्धा निर्मुलन<br>- व्यसनाधीनता<br>- व्यक्तिमत्व विकास |
| **श्री. अमित डोंगरे** | - सायबर सिक्युरिटी आणि सायबर गुन्ह्याबाबत जागरुकता<br>- बदल व्यवस्थापन<br>- औद्योगिक संबंध<br>- कामगार कायदे |
| **श्री. गजानन पाटील** | अन्न भेसळ कायदा जागो ग्राहक जागो |
| **श्री. आनंद घैसास** | सौंदर्य प्रसाधनांमागील सत्य |
| **श्री. निलेश मंडलेचा** | भावनिक बुद्धिमत्ता आणि स्ट्रेस मॅनेजमेंट |
| **डॉ. प्रदिप धिवर** | कोरोना विषयी जनजागृती व माहिती. |


महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी



माझगांव डॉक शिपबिल्डर्स लि.


नेहरू सायन्स सेंटर







प्रशिक्षण वर्गाच्या पहिल्या टप्प्यात मुंबईमधील औद्योगिक कंपन्या आणि शैक्षणिक संस्थाना शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती. याअंतर्गत हाफकिन संस्थेचे ऐतिहासिक संग्रहालयास भेट, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी कांदिवली, टाटा टेक्स्टाईल मिल दादर, नेहरू सायन्स सेंटर वरळी, माझगांव डॉक शिपबिल्डर्स लि. माझगांव येथे कामगारांच्या शैक्षणिक भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या.

150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

# राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची २ ऑक्टोबर २०१९ रोजी १५० वी जयंती साजरी करण्याकरिता हाफकिन महामंडळामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते .

हाफकिन महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेश देशमुख (भा.प्र.से.), श्री. सुभाष शंकरवार महाव्यवस्थापक उत्पादन, श्री बबन ढेकणे अध्यक्ष हाफकिन ऑफिसर्स आसोसिएशन, श्रीमती रश्मी शिंपी प्र. व्यवस्थापक प्रशासन, श्री प्रदीप आचरेकर सरचिटणीस मान्यताप्राप्त कामगार संघटना मुंबई या मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. श्री अमित डोंगरे, श्री किरण जाधव, श्री विजय मोजर, श्री आशिष पवार, श्रीमती श्रेयसी मुळे, श्रीमती रश्मी शिंपी, श्री प्रदीप आचरेकर, श्री बबन ढेकणे, श्री सुभाष शंकरवार, आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजेश देशमुख यांनी महात्मा गांधी विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी हाफकिन महामंडळ संचलित बालवाडीतील लहान मुलांनी 'गांधी विचारांच्या प्रभात फेरी' चे आयोजन केले होते.

'महात्मा गांधी एक शांतिदुत', 'महात्मा गांधी आज असते तर' या विषयावर निबंध स्पर्धा आणि 'महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान' या विषयावर महामंडळातील कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विजयी स्पर्धकांना मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कर्मचाऱ्यांनी काढलेल्या चित्रांचे आणि निबंधाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

श्री अमित डोंगरे यांनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन आणि सूत्रसंचालन केले. श्रीमती उषा मकवना, श्रीमती रश्मी शिंपी, श्रीमती श्रेयसी मुळे यांनी 'रघुपती राघव राजाराम' आणि 'वैष्णव जण तो तेंन कहिये' या महात्मा गांधीजी यांच्या भजनाचे गायन केले.

### चित्रकला आणि निबंध स्पर्धेतील विजयी अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियातील सदस्यांची नावे खालील प्रमाणे

**चित्रकला स्पर्धा**

**प्रथम क्रमांक -** कुमारी मानसी आनंद वाघ
**प्रथम क्रमांक -** श्रीमती प्राची तारे

**व्दितीय क्रमांक -** श्रीमती सोनाली पांडुरंग बुरकुले
**व्दितीय क्रमांक -** श्री. विलास शिवराम मोरे

**तृतीय क्रमांक -** श्री. आणि सौ. नमिता निळकंठ वायंगणकर

**निबंध स्पर्धा**

**प्रथम क्रमांक -** श्री. किरण राजाराम जाधव
**प्रथम क्रमांक -** श्रीमती शेरॉन स. रुबेन बोरकर

**व्दितीय क्रमांक -** श्रीमती मंगल सुनिल भिसे
**व्दितीय क्रमांक -** श्रीमती जागृती हणमंत पवार

**तृतीय क्रमांक -** कुमारी स्नेहल सुखदेव मानकुंबरे
**तृतीय क्रमांक -** कुमारी अश्विनी बालासाहेब मुंडे














YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

# राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

## प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग

**हा**फकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल या पिंपरी विभागामध्ये महात्मा गांधी यांचे विचार आत्मसात आणून त्याप्रमाणे कृती करण्याची सर्व कर्मचारी यांनी प्रतिज्ञा केली. डॉ. शिवाजी गाडे, श्री. नवनाथ गर्जे, श्री. मिलिंद कळोलीकर, श्री. प्रफुल बोरदे, श्री. प्रवीण वाघमारे यांनी महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन केले. कर्मचाऱ्यांनी 'स्वछता अभियान' आयोजित करून महामंडळाबाहेरील परिसराची स्वछता केली. महात्मा गांधीजींचा शासनाने तयार केलेला 'स्वच्छ भारत लोगो' हाफकिन महामंडळाच्या लेटरहेडवर वर्षभर वापरण्याचा निर्णय घेण्यात आला.








**हा**फकिन महामंडळाच्या परळ विभागातील मौखिक पोलिओ विभागाचे परीक्षण करणेकरिता जागतिक आरोग्य संघटनेचे खालील नमूद परीक्षकांनी दि. १६.१२.२०२० ते दि २०.१२.२०२० रोजी महामंडळाला भेट दिली.

- श्री. मुस्तफा चफाई, टेक्निकल ऍडवायझर, डब्लूएचओ जिनिव्हा
- श्री. ऍलेन फाकोनियर, सीएमसी, क्वालीटी असेसर, डब्लूएचओ जिनिव्हा
- श्री. मनिष सिंघल, असिस्टंट ड्रग्ज कंट्रोलर (आय), सीडीएससीओ (वेस्ट झोन)
- श्री. संग्राम वुरुमडला, ड्रग्ज इन्स्पेक्टर, सीडीएससीओ ( हेडकॉर्टर)
- श्री. दिपक मालपुरे, ड्रग्ज इन्स्पेक्टर, एफडीए (महाराष्ट्र)




# मोफत आरोग्य तपासणी शिबीर

महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आणि हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ आणि मान्यताप्राप्त कामगार संघटना परळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हाफकिन महामंडळातील कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांकरिता 'मोफत आरोग्य तपासणी शिबिर' दिनांक २७.११.२०१९ आणि दिनांक २८.११.२०१९ या दिवशी महामंडळाच्या वसाहतीमधील जिमखान्यामध्ये आयोजित करण्यात आले होते.

ग्लोबल हॉस्पिटलच्या सहकार्याने सदर मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये रॅण्डम ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, बॉडी मास इंडेक्स, ईसीजी, नेत्रतपासणी, डॉक्टर कन्स्लटेशन इ. तपासणी करण्यात आल्या.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे महाव्यवस्थापक उत्पादन श्री. सुभाष शंकरवार, कामगार कल्याण अधिकारी श्री. अमित डोंगरे, मान्यताप्राप्त कामगार संघटना परळ, मुंबई चे सरचिटणीस श्री. प्रदीप आचरेकर, ग्लोबल हॉस्पिटलचे कोऑर्डीनेटर डॉ. निलेश कदम आणि त्यांचे सहकारी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे निरीक्षक श्री. विजय कुडतरकर, श्री. भाऊ नाटलकर, श्रीमती मृण्मयी मोडक, श्रीमती विदया तावडे, श्री. श्रीकृष्ण पाटोले यांच्या सहकार्याने सदर शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले.





# योगसाधना शिबीर

प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ श्री. निलेश मंडलेचा आणि श्रीमती. प्रज्ञा मंडलेचा यांच्यामार्फत दि. १७.०२.२०२० पासून हाफकिन महामंडळातील कर्मचारी आणि त्यांच्या कुटूंबातील सदस्यांकरिता ७ दिवसांचे मोफत योगसाधना शिबीराचे आयोजन वसाहतीमधील जिमखान्यामध्ये करण्यात आले होते. श्री. निलेश मंडलेचा आणि श्रीमती प्रज्ञा मंडलेचा यांच्यामार्फत शास्त्रोक्त पध्दतीने प्रशिक्षण घेतल्यानंतर आणि प्रत्येक योगसाधनेतील बारकावे समजल्यानंतर योगाभ्यास करताना होत असलेल्या चूका योगसाधकांना समजल्या. योगाभ्यास हा भराभर न करता तो सावकाश करून त्याचा आनंद घ्यायचा असतो आणि या आनंदाचा अनुभव सर्वांना योगसाधना शिबिराच्या माध्यमातून अनुभवता आला.

श्री. निलेश मंडलेचा आणि श्रीमती. प्रज्ञा मंडलेचा यांचे हाफकिन महामंडळाच्या वतीने मन:पूर्वक आभार आणि धन्यवाद !





१४वी आंतरराष्ट्रीय कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटि परिषदेचे आयोजन दि. ०४.०३.२०२० आणि दि. ०५.०३.२०२० रोजी मुंबई येथील हॉटेल ताज लॅण्ड येथे करण्यात आले होते. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये हाफकिन महामंडळातर्फे श्री. एस. जी. पाल व्यवस्थापक पणन, श्रीमती. शेरान रुबेन बोरकर उपव्यवस्थापक उत्पादन, श्री. बी.जी. ढेकणे प्र. व्यवस्थापक सामुग्री, श्रीमती रश्मी शिंपी प्र. व्यवस्थापक प्रशासन, श्रीमती. यास्मीन शेख पध्दती विश्लेषक, श्रीमती. सोनल सावंत उपव्यवस्थापक उत्पादन, श्रीमती. श्रेयसी मुळे, सहाय्यक व्यवस्थापक (उत्पादन) सहभागी झाले होते.



# हार्दिक अभिनंदन!

८ मार्च २०२० या जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने मुंबई विभागातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार केला.

हाफकिन महामंडळातील गुणवत्ता नियंत्रण विभागातील कर्मचारी श्री नरेश सावंत यांच्या पत्नी श्रीमती सुप्रिया नरेश सावंत यांनी 'रुग्णसेवा क्षेत्रात' केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.



श्रीमती सुप्रिया नरेश सावंत या परिचारिका आहेत. त्यांना या क्षेत्रात २० वर्षांचा अनुभव आहे. जे.जे. हॉस्पिटल येथून त्यांनी परिचारिकेचा कोर्स केला आणि नंतर ओमान या देशात जाऊन २ वर्षे वैद्यकीय क्षेत्रात काम केले. त्यानंतर देशात परत येऊन ससून रुग्णालयात काम केले आणि आता शासकीय दंत महाविद्यालय मुंबई येथे परिचारिका म्हणून कार्यरत आहेत.

हाफकिन महामंडळातील ८० टक्के कर्मचारी हे महामंडळ वसाहतीमध्ये राहतात. कधी वेळी रात्री-अपरात्री सुद्धा वैद्यकीय सेवेची कोणाला गरज पडली तर श्रीमती सुप्रिया सावंत या तेथे जाऊन मदत करतात. त्यामुळे त्या 'हाफकिन वसाहतीमधील परिचारिका' म्हणून लोकप्रिय आहेत.

पती, एक मुलगा, सासु सासरे अशा सर्वांची कौटुंबिक कामे पूर्ण करून दररोज न चुकता त्या किमान एक तास टाटा कॅन्सर हॉस्पिटल येथे जाऊन कॅन्सरग्रस्त लहान मुलांच्या विभागात समाजसेवा करतात. कॅन्सरग्रस्त लहान मुले आणि त्यांच्या कुटुंबियांना मदत करतात. कॅन्सरग्रस्त लहान मुलांबरोबर खेळणे, देशातील विविध कानाकोपऱ्यातून आलेले कॅन्सरग्रस्त रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांचे समुपदेशन करणे, त्यांना औषधे कोठे कमी खर्चात मिळतात हे सांगणे, पुढील उपचाराकरिता त्यांना मानसिक आधार देणे, उपचारा संबंधी त्यांना पडलेल्या प्रश्नांचे निराकरण करणे, त्यांना इतर सामाजिक संस्थांकडून आर्थिक मदत मिळवून देण्याकरिता मदत करणे इत्यादी समाजसेवी कामे श्रीमती सुप्रिया सावंत या अनेक वर्षांपासून करीत आहेत. विशेष म्हणजे श्रीमती सुप्रिया सावंत या शासकीय परिचारिका असल्यामुळे टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाने देखील रुग्णांची समाजसेवा करायला त्यांना परवानगी दिली आहे. श्रीमती सुप्रिया नरेश सावंत यांचे हार्दिक अभिनंदन!!



**म**हाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयोजित 'कामगार पुरुष व महिला भजन स्पर्धा २०१९-२० पुणे गट विभाग' या स्पर्धेमध्ये हाफकिन महामंडळाच्या पिंपरी विभागातील महिला भजनी मंडळास तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!!





**हा**फकिन महामंडळाच्या पिंपरी विभागातील संघाने दिनांक ३०.११.२०१९ रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ पुणे आयोजित राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक मिळविला. पिंपरी विभागातील नृत्य संघाचे हार्दिक अभिनंदन.







आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी केवळ एकाच व्यक्तीने घराबाहेर पडावे.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे
हाफकिन वृत्त

# भटकंती

**का**मगार भटकंती अंतर्गत हाफकिन महामंडळातील कामगारांनी श्री दिनेश नामदेव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली जानेवारी २०२० मध्ये कोकण आणि गोवा येथे भटकंती आयोजित केली होती.





**म**हाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने हाफकिन महामंडळातील कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांकरिता डिसेंबर २०१९ मध्ये शिर्डी येथे 'कामगार सहल' आयोजित करण्यात आली होती.





## चित्रबोध

**शेजारील चित्र पाहून आपणास काय चित्रबोध होतो याबाबत किमान १० ओळींमध्ये लेखी माहिती मराठी भाषेमध्ये हाफकिन वृत्त समितीला पाठवा. अत्युत्कृष्ठ असलेली माहिती आम्ही पुढील अंकामध्ये प्रसिध्द करू तसेच अत्युत्कृष्ठ माहिती पाठविलेल्या अधिकारी/कर्मचारी यांस हाफकिन वृत्त समितीकडून एक विशेष बक्षिस देण्यात येईल.**



हाफकिन वृत्त मुखपत्राच्या मागील १२व्या अंकामधील चित्रबोधाचा अतिशय चांगल्याप्रकारे अर्थ समजावून त्याची माहिती हाफकिन वृत्त समितीला मुंबई विभागातील अधिकारी **श्रीमती मनिषा शिंदे**, सहाय्यक व्यवस्थापक उत्पादन यांनी पाठविली. मागील चित्रबोध सदराचे विजेते म्हणून श्रीमती मनिषा शिंदे यांचे हार्दिक अभिनंदन. हाफकिन वृत्त समिती कडून त्यांना विशेष बक्षिस देण्यात येईल. त्यांनी पाठविलेले उत्तर खाली प्रसिद्ध करीत आहोत.

मागील हाफकिन वृत्त अंक १२ मधील चित्रबोध सदरातील चित्र पाहून असा बोध होतो की,



चित्रबोध सदरामध्ये एक पुतळा आहे , ज्यामध्ये एक व्यक्ती त्याच्याच शिराचे ओझे वाहताना दाखविलेला आहे. डोळे बंद आहेत याचा अर्थ माणूस उघड्या डोळ्यांनी प्रगल्भ असा विचार न करता इतरांबद्दल, समाजाबद्दल,परिस्थितीबद्दल आणि एकूण जीवनाबद्दल त्याला हवा तसा डोळे झाकून विचार करतो , कल्पना करतो आणि ते तसेच आहे असं स्वतः ठामपणे ठरवतो पण प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असते. आयुष्यभर विचारांचे गाठोडे अविरतपणे वाहत राहतो त्यानेच थकतो, दमतो, आणि त्या ओझ्याखाली एक दिवस मरतो; साधं, सोपं, सरळ आयुष्य अवघड करून ठेवतो. सामान्य माणसाच्या वृत्तीच हे समग्र दर्शन या चित्रातून व्यक्त होते.

**श्रीमती मनिषा शिंदे**
सहाय्यक व्यवस्थापक उत्पादन
गुणवत्ता आश्वासन विभाग

# दीपावली सोहळा

हाफकिन महामंडळामध्ये वर्ष २०१९ मध्ये दीपावली निमित्त दीपप्रज्वलन सोहळा आयोजित करण्यात आला होता. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेश देशमुख (भा.प्र.से.), महाव्यवस्थापक (उत्पादन) श्री सुभाष शंकरवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. हाफकिन महामंडळाच्या सर्व कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना दीपावलीनिमित्त उत्पादनाशी निगडित रुपये २५०००/- बोनस देण्यात आला.





# सेवानिवृत्ती समारंभ

## आभार

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे अधिकारी आणि कर्मचारी यांचा त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी महामंडळ निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करते. हाफकिन महामंडळातून सेवानिवृत्त होणा-या अधिकारी आणि कर्मचारी यांस शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, डॉ. हाफकिनचे स्मृतिचिन्ह, अनुभव प्रमाणपत्र, उपदान धनादेश, रजा रोखीकरणाचा धनादेश तसेच निवृत्त कर्मचारी यास त्याच्या आवडीची एक भेटवस्तू देवून सत्कार करण्यात येतो.

## हाफकिन महामंडळाच्या परळ, मुंबई विभागामधून दिनांक १ सप्टेंबर २०१९ नंतर सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचारी



**श्री. प्रदिप रा. आचरेकर**
अभियांत्रिकी सहाय्यक वर्ग 'ई'
यंत्रपरिरक्षण विभाग
सेवानिवृत्ती दि. ३०.०६.२०२०




**श्रीमती अपर्णा अशोक गुरव**
उत्पादन सहाय्यक वर्ग 'ब'
मौखिक पालिओ विभाग
सेवानिवृत्ती दि. ३१.१०.२०१९

## हाफकिन अजिंठा फार्म लि. जळगांव विभागामधून दिनांक १ सप्टेंबर २०१९ नंतर सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचारी



**श्री. रामचंद्र के. हरणकर**
प्रोसेस वर्कर
सेवानिवृत्ती दि. ३१.०५.२०२०



**श्री. सदाशिव कृ. रोकडे**
प्र. महाव्यवस्थापक
सेवानिवृत्ती दि. ३०.०६.२०२०



**श्री. अर्जुन रा. आवारे**
प्रोसेस वर्कर
सेवानिवृत्ती दि. ३०.०६.२०२०



सूचना- गर्दी व संसर्ग टाळण्यासाठी दुकानदारांनी व्हाट्सॲपवर ऑर्डर घेऊन ग्राहकांना डिलिव्हरीची वेळ द्यावी.

# बाळगोपाळांच्या राज्यात















हाफकिन महामंडळाच्या कामगार कल्याण उपक्रमांतर्गत महामंडळातील अधिकारी व कर्मचा-यांच्या पाल्यांकरिता चालविण्यात येणा-या हाफकिन बालवाडी व नर्सरीमध्ये विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम आयोजित केले जातात या उपक्रमांचा चित्र स्वरूपात घेतलेला मागोवा.

विशेष म्हणजे माहे ऑक्टोबर २०१९ या महिन्यामध्ये महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणुक होती. भारतीय संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकाला दिलेला अमूल्य असा मतदानाचा हक्क सर्व मतदारांनी बजावावा याकरिता हाफकिन बालवाडी मधील लहान मुलांनी ‘मतदार जागृती मोहीम’ राबविली होती. या मोहिमेअंतर्गत लहान मुलांनी मतदान करण्याबाबत जनजागृती निर्माण केली.

# ध्वजवंदन




२६ जानेवारी २०२०











२६ जानेवारी २०२० या प्रजासत्ताक दिनी हाफकिन महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेश देशमुख (भा.प्र.से.) यांच्या हस्ते परळ विभागामध्ये ध्वजारोहण करण्यात आले. १५ ऑगस्ट २०१९ या स्वातंत्र्य दिनी महामंडळातील ज्येष्ठतम कर्मचारी श्री. राजेंद्र तांबे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग येथे प्र. व्यवस्थापक डॉ. शिवाजी गाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. हाफकिन अजिंठा फार्मा लि. जळगांव येथील ज्येष्ठतम कर्मचारी श्री. अनिल ना. जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



सूचना - संसर्गाची चिन्हे दिसल्यास प्रथम स्वतः ला सर्वांपासून वेगळे करा आणि हेल्पलाईनवर फोन करा.

मुद्रण : संजय प्रिन्टर्स - ९८१९६१४४७५